नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०५/२०२६ (शनिवार )**

# पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण येथे प्रभावी गुन्हे तपास आणि दोषसिध्दी वाढीसाठी घेण्यात आली विशेष कार्यशाळा

पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण जिल्हा येथे दि. ०९/०५/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनात प्रभावी तपास आणि गुन्हे दोषसिध्दी वाढविण्याच्या अनुषंगाने विशेष कार्याशाळा आयोजित करण्यात आली होती.

सदर कार्यशाळेला प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर येथील सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती कल्पना पांडे उपस्थित होत्या. पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्याचे तपास करून गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायदानास्तव न्यायालयात सादर केले जाते. न्यायालयात गुन्ह्याची संपरीक्षेदरम्यान गुन्ह्यातील साक्षीदार व पुरावे तपासले जातात व नंतर सरकारी पक्ष व बचाव पक्ष यांचे युक्तीवाद झाल्यानंतर शेवटी न्यायालय गुन्ह्याचा दोषसिध्द अथवा दोषमुक्त असा अंतिम निकाल देतात. आरोपी गुन्हा करतात, परंतू काही क्षुल्लक कारणास्तव आरोपी हे गुन्ह्यातून दोषमुक्त होतात, त्यामुळे समाजात सदर बाबीचा नकारात्मक संदेश जात असून आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याच्या अनुषंगाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत मुख्य मार्गदर्शक श्रीमती कल्पना पांडे, सहा. सरकारी अभियोक्ता यांनी गुन्ह्याची प्रथम खबर (FIR) दाखल करण्यापासून ते गुन्ह्याचे पंचनामे तयार करणे, आरोपीतांविरूध्द भौतिक, जैविक, रासायनिक, इलेक्ट्रॉनिक तसेच इतर प्रकारचे पुरावे गोळा करतांना तसेच पुरावे जप्त करतांना व हाताळतांना घ्यावयाची काळजी, चेन ऑफ कस्टडी, सदर बाबत मुद्देमाल रजिस्टर मध्ये घ्यावयाच्या नोंदी तसेच सदर संपूर्ण प्रक्रीयेदरम्यान अवलंबवयाची कार्यपध्दती, व मा. उच्चन्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालय यांचे न्याय—निवाडे व कायदेशिर बाबी

याबाबत उपस्थित सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सविस्तर मार्गदर्शन केले. उपस्थित सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर कार्यशाळा ही अतिशय उपयुक्त असल्याची व दोषसिध्दीच प्रमाणात वाढ होण्यास उपयोगी ठरेल अशी प्रतिक्रीया व्यक्त केली.

सदर कार्यशाळेत प्रामुख्याने श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील कोर्ट मॉनिटरींग सेलचे पोलीस निरीक्षक श्री, विशाल गिरी, सहा. पोलीस निरीक्षक श्री. विशांत नांदगाये इतर अंमलदार तसेच नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन येथील पोलीस अधिकारी, तपासी अंमलदार, मुद्देमाल मोहरर, सत्र न्यायालयातील कोर्ट पैरवी अंमलदार असे ११० पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.





# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,०६ जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०८/०५/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा कडुन नागपूरकडे अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा माथनी टोल नाका येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक बोलेरो पिकअप क्र. एम एच ४० सी एम ७८१४ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता चालक नामे गणेश नंदलाल कावळे, वय २६ वर्ष, रा. इटगाव, ता. पवनी, जि. भंडारा हा मिळुन आला. वाहनात ०६ जनावरे **(म्हशी)** मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निदर्यतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलेरो पिकअप क्र. एम एच ४० सी एम ७८१४ किंमती ५,००,०००/— रूपये आणि ६ म्हशी किंमती ७५,०००/— असा एकुण ५,७५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नुमद प्रकरणी आरोपी चालक गणेश नंदलाल कावळे, वय २६ वर्ष, रा. इटगाव, ता. पवनी, जि. भंडारा याचेविरूध्द कलम ११(१) (ड), (ई), (फ), (ह) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या १० आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये १० गुन्हे नोंद

दिनांक ०८/०५/२०२६ **रोजी** नागपूर ग्रामीण जिल्हयांतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत** आरोपी अनिकेत शिवाजी दाभने, वय ३२ वर्ष, रा. इंदरवाडा हा मौजा जलालखेडा ते नारसिंगी रोड च्या बाजुला सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत** पुसागोंदी येथे आरोपी भंगु धनसिग पवार, वय ५२ वर्ष, रा. पुसागोंदी हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन भिवापूर** अंतर्गत सिद्धार्थ नगर भिवापूर येथे आरोपी अमोल रमेश मेश्राम, वय ३१ वर्ष, रा.सिदधार्थ नगर भिवापुर, ता. भिवापुर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पाचगाव अंतर्गत** आरोपी प्रणय राजकुमार देशमुख, वय २४ वर्ष, रा. त्रिचरण चौक, रामेश्वर चौक, नागपूर हा मौजा मटकाझरी शिवार येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत शिवटेकडी परिसर येथे आरोपी सुनिल राधेश्याम पुसदकर, वय ५६ वर्ष, रा. प्रभाग क्र ०९, पारशिवनी, ता. पारशिवनी हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत** आरोपी १) रामखिलावन श्यामचरण पटेल, वय ३० वर्ष, रा. हमु विटभट्टी, उमरी रामटेक हा पिंडकेपार बस स्टॉप जवळ २) राजकुमार रामदिन सरोज, वय ३८ वर्ष, रा. हल्ली मुक्काम भागचेद यांचे विटभटटावर मुसेवाडी रामटेक ३) अफजल वहदि शाह, वय २९ वर्ष, रा हल्ली

मुक्काम, विटभटटावर मुसेवाडी रामटेक हे टक्कामोरे लॉन जवळ **आणि** ४) सुनिल धन्नू उइके, य ५१ वर्ष, रा. कांद्री माइन, ता. रामटेक हा क्रिष्ण मंदिर परिसर तलाव येथे सर्व आरोपी सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोस्टे कळमेश्वर अंतर्गत** मौजा ब्राम्हणी येथे आरोपी नासिर नजिर खा पठाण, वय ३० वर्ष, रा. ब्रामणी, ता.कळमेश्वर हा सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद १० आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये १० गुन्हे नोंद करण्यात आले आहे

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०५ गुन्हे नोंद.एकुण ५,१२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०८/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ५,१२५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे प्रकाश रामचंद्रजी ढोणे, वय ४९ वर्ष, रा. सिंजर, ता. नरखेड,यांचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. तसेच **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे रोशन शामरावजी गोंने, वय २८ वर्ष, रा. तिनखेडा, तह. नरखेड, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे चंद्रशेखर पंजाबराव पाटील, वय ४३ वर्ष, रा वार्ड क्र. ०३, करसघाट, ता सावनेर, जि. नागपुर, ह. मु. ऑफीसर कॉलोनी तिवारी यांचे घरी किरायाने, शिरूर ता. हिंगणा, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे दिपक शामराव जिवतोडे, वय ३६ वर्ष, रा. गोदावरी नगर, बुटटीबोरी, ता. जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे सुरेश श्रीराम कावळे, वय ४३ वर्ष, रा. सावळी, ता कुही, जि. नागपूर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, अशा ०५ आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०५ गुन्हे दाखल केले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २६ गुन्हे नोंद

दिनांक ०८/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू व साहित्य असा एकुण १३,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन केळवद येथे २ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन सावनेर येथे ०२ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन उमरेड येथे २ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन कुही येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन भिवापूर येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन बोरी येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन बेला येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन कोंढाळी येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन नरखेड येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन काटोल येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन अरोली येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन पारशिवनी येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन रामटेक येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन कन्हान येथे २ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन वडोदा येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन मौदा येथे १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ५५ लिटर मोहाफुल गावठी दारू, १८,४५० मिली देशी दारू असा एकुण १३,७००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७५६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०९/०५/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७५६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २६ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ५० आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १६ आरोपी अशा एकुण १५४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १८ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १३ आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६२ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १७४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ७५६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने